


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १२८ * नांदेड * शुक्रवार, दि. १५ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नीट पेपरफुटी, लातूरमधून सेवानिवृत्त प्राध्यापकाच्या घराची झडती; मोबाईल आणि कागदपत्रे ताब्यात

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या नीट पेपरफुटीचं महाराष्ट्र कनेक्शन उघड झालं असून सीबीआयकडून सखोल तपास सुरू आहे. नाशिक, अहिल्यानगर, पुणेनंतर नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात लातूर कनेक्शन अधिक गडद होत असून, सीबीआयच्या तपासातून नवनवीन धागेदोरे समोर येत आहेत. तपासादरम्यान लातूरमधील एका सेवानिवृत्त प्राध्यापकाच्या घरी गुरूवारी पोलिसांनी झडती घेतली, यावेळी काही कागदपत्रे आणि मोबाइलही जप्त करण्यात आला आहे. पुण्यात ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारे हिच्याशी संबंधित सेवानिवृत्त प्राध्यपकाचा संपर्क असल्याचे उघड झाल्याची माहिती आहे. दोघांमधील संपर्काचा उलगडा कॉल डिटेल्समधून झाल्याचे सांगितले जात आहे.

पुणे पोलिसांनी बुधवारी मनीषा वाघमारे या ब्युटीपार्लर चालक महिलेला बिबडेवाडी येथून अटक केली होती. त्यानंतर, मनीषाला सीबीआयकडे सोपविण्यात आले. आता, सीबीआयच्या चौकशीत मनिषाचे लातूर कनेक्शन समोर आले असून लातूरमधील एका सेवानिवृत्त प्राध्यापकाच्या घरी पोलीस अधिकाऱ्यांनी आज झडती घेतली. त्यासाठी, सीबीआय पथक मध्यरात्रीच लातूरमध्ये आले होते. शिक्षणाचा लातूर पॅटर्न म्हणून परिचित असलेल्या लातूरमध्ये शैक्षणिक क्षेत्राला हादरा देणारी ही बातमी आहे.

संबंधित सेवानिवृत्त प्राध्यापक नीट पेपर सेट करण्याच्या प्रक्रियेत सक्रिय होता का? याबाबत मोबाईल तपासात काही आर्थिक व्यवहार झाले आहेत का? याचीही चौकशी सुरू असून, त्याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

सीबीआयचे पथक आता लातूरमधील विविध महाविद्यालये तसेच खासगी ट्युशन एरियातील कोणत्या व्यक्तींशी या प्राध्यापकाचे संबंध होते का, याची तपासणी करत आहे. यापूर्वी काही खासगी क्लास चालकांचीही चौकशी करण्यात आली होती.

दरम्यान, सीबीआयच्या पथकाने संबंधित सेवानिवृत्त प्राध्यापकाच्या घराची झडती घेतली असून, काही कागदपत्रे आणि मोबाईल ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे लातूरच्या शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, तपास आणखी व्यापक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### नीट घोटाळ्याप्रकरणी २१ बँक खात्यांतून पैशांचा महापूर

नीट पेपर फुटी प्रकरणातील पुण्यातून ताब्यात घेतलेल्या महिलेची धक्कादायक माहिती समोर समोर आली आहे. नीट परीक्षेच्या प्रक्रियेच्या दरम्यान मनीषा वाघमारे यांच्याकडे तब्बल २१ वेगवेगळ्या बँक खात्यांतून लाखो रुपये जमा केल्याचे तपासातून समोर आले आहे. ही रक्कम पेपर विक्रीसाठी किंवा त्यासंबंधित व्यवहारांसाठी आगाऊ म्हणून घेण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे.

## अशोक खरात प्रकरणी उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे निलंबित

**मुंबई (प्रतिनिधी)–** अशोक खरात प्रकरणात राजकीय नेत्यांनंतर आता प्रशासकीय अधिकारीही अडचणीत आल्याचं दिसतं आहे. अशोक खरात सोबत आर्थिक व्यवहार असल्याचा आरोप असलेल्या उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे याचे निलंबन करण्यात आलं आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिजित भांडेच्या निलंबनाचे आदेश दिले.

उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेल्या अभिजीत भांडे याला अशोक खरात प्रकरण चांगलंच भोवल्याचं चित्र आहे. अशोक खरातसोबत असलेले आर्थिक व्यवहार त्याच्या अंगलट आले आहे. अशोक खरात याच्यासोबतच अभिजित भांडे याचे कॉल रेकॉर्डस हाती आल्यानंतर महसूलमंत्र्यांनी त्याच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत.

भोंदू अशोक खरात आणि उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांच्यामध्ये तब्बल १४३ वेळा फोन कॉल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये अशोक खरातने अभिजीत भांडेला ८३ वेळा कॉल केले आहेत. तर भांडेने खरातला ६० वेळा कॉल केले आहेत.

# पुढील सहा महिने मोठ्या शासकीय कार्यक्रमांचे आयोजन करणार नाही

### बुलेटवरून विधानभवनात पोहचल्यानंतर फडणवीसांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** पुढील सहा महिने मोठ्या शासकीय कार्यक्रमांचे आयोजन करणार नाही, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशवासीयांना इंधन बचतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी सर्वांनाच चकित केले. मुख्यमंत्री फडणवीस चक्क 'रॉयल एनफिल्ड ३५०' या दुचाकीवरून विधान भवनात दाखल झाले. यानंतर त्यांनी माहिती दिली.



यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली. ते म्हणाले की, पंतप्रधानांनी जे काही निर्देश दिले आहेत ते देशहिताकरिता आहेत. त्यामुळे आपापल्या परीने जे जे करता येईल त्यासाठी आम्ही सगळे प्रयत्न करत आहोत. राज्यातले नेते मंडळी जेव्हा अशा प्रकारे प्रचार करतात, ते लोकांपर्यंत पोहोचते म्हणून मी आज मोटार सायकलने आलेलो आहे. आमचा ताफा देखील कमी केलेला आहे. सर्वांचा परदेशातील प्रवास देखील आम्ही रद्द केलेला आहे. वेगवेगळ्या प्रकारे इंधन बचत कसे करता येईल, तसेच परकीय चलन बचत कशी करता येईल? हा आमचा प्रयत्न असेल.

ते पुढे म्हणाले, उद्या साताऱ्याला एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचं आधीच नियोजन झालेले असल्याने आणि त्यावर आधीच पैसा खर्च झालेला असल्याने तो कार्यक्रम आम्ही रद्द केलेला नाही. पण, यानंतर पुढील सहा महिने आम्ही शासनाच्या वतीने कुठल्याही मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करणार नाही, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.

पंतप्रधानांच्या आवाहनावर विरोधकांनी केलेल्या टीकेचा समाचार घेताना फडणवीस म्हणाले, विरोधी पक्षाला थोडी प्रगल्भता यावी लागेल. जगातील सर्व देश याहीपेक्षा कठोर निर्णय घेत आहेत. त्यावेळी पंतप्रधानांनी आपल्याला केवळ थोडासा त्याग करायला सांगितला आहे. कुठलेही कठोर निर्णय घेण्यात आलेले नाहीत. त्यावर इतका गदारोळ उभे करणे योग्य नाही. यापूर्वी इंदिरा गांधी असताना असे झालेले आहे. चिदंबरम यांनीदेखील २०१२ साली अशा प्रकारचा निर्णय घेतला होता. त्यामुळे असे वागणे योग्य नाही. आंतरराष्ट्रीय परिस्थिती अशी तयार झाल्यामुळे देश हितासाठी आपण थोडेही जुळवून घ्यायला तयार नसलो तर विरोधी पक्षाला प्रगल्भता नाही, असेच म्हणावे लागेल.

## स्विमिंग पूलमध्ये बुडून नऊ वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू

**हिमायतनगर (प्रतिनिधी)–** शहरातील नव्याने सुरू करण्यात आलेल्या गिरीजा वॉटर स्विमिंग पूलमध्ये एका नऊ वर्षीय बालकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरूवार, दि. १४ मे रोजी दुपारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त केली जात असून स्विमिंग पूलमधील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सक्षम नागोराव गायकवाड (वय ९ वर्षे) हा बालक त्याच्या आई सोबत भिसीवरून हिमायतनगर येथे आजोळी आला होता. त्याने आईकडे हट्ट केल्यामुळे त्याला आईने पोहण्यासाठी गिरीजा वॉटर स्विमिंग पूलमध्ये नेले. यावेळी तो पुलातून १ तासापासून बाहेर न आल्यामुळे तो पाण्यात बुडाल्याचे लक्षात आले. यानंतर नागरिकांनी तत्काळ बालकाला पाण्याबाहेर काढून उपचारासाठी हिमायतनगर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून सक्षमचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

या घटनेनंतर बालकाच्या कुटुंबियांनी मोठा आक्रोश केला. स्विमिंग पूल परिसरात कोणतीही योग्य सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप मृत बालकाच्या आईने केला आहे. पूल परिसरात प्रशिक्षित लाईफ गार्ड, सुरक्षा साधने किंवा लहान मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी कर्मचारी नसल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

या घटनेमुळे शहरात शोककळा पसरली असून संबंधित स्विमिंग पूल प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती मिळाली.

## महाराष्ट्रासह १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर राबवणार; निवडणूक आयोगाची घोषणा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगानं एसआयआरचा तिसरा टप्पा जारी केला आहे. या तिसऱ्या टप्प्यात १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचा देखील समावेश आहे. महाराष्ट्रात एसआयआरची प्रक्रिया २० जूनपासून सुरु होईल ती प्रक्रिया ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर पूर्ण होणार आहे.एसआयआरचा तिसरा टप्पा २० मे पासून सुरु होईल आणि तिसरा टप्पा २३ डिसेंबरल २०२६ ला संपणार आहे.

आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, तेलंगाणा, उत्तराखंड या राज्यांमध्ये एसआयआर होणार आहे.

नवी दिल्ली, चंदीगड आणि दादरा नगर हवेली आणि दीव दमण या केंद्रशासित प्रदेशात एसआयआर प्रक्रिया राबवली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगानं एसआयआर प्रक्रिया मतदार यादी अचूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्यात ३.९४ लाख बूथ लेव्हल ऑफिसर्स घरोघरी भेटी देऊन ३६.७३ कोटी मतदारांची माहिती घेतील. यासाठी त्यांना मदत करण्यासाठी ३.४२ लाख बूथ लेव्हल एजंट मदत करतील, ज्यांची नियुक्ती राजकीय पक्षांकडून करण्यात आली आहे.

## दिल्ली पुन्हा हादरली! कामावरून परतणाऱ्या महिलेवर बसमध्ये सामूहिक बलात्कार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राजधानी दिल्लीत कामावरून परतणाऱ्या एका महिलेला जबरदस्तीने बसमध्ये नेऊन तिच्यावर बसचा ड्रायव्हर व कंडक्टर यांनी अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला असून संबंधित ड्रायव्हर व कंडक्टरला अटक केली आहे.

या प्रकरणाचा सविस्तर तपास दिल्ली पोलीस करत आहेत. बसच्या फॉरेन्सिक रिपोर्टचादेखील आरोपपत्रात समावेश करण्यात येणार असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे.

पोलिसांकडून यासंदर्भात गुरुवारी माहिती मिळाली असून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारानंतर पीडित महिलेनं थेट राणीबाग पोलीस स्थानकात आरोपींविरोधात तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणी भारतीय न्याय संहितेतील कलम ६४(१) बलात्कार, कलम ७० (१) सामूहिक बलत्कार यानुसार गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींना तात्काळ अटक करण्यात आल्याचं देखील पोलिसांनी सांगितलं.

## एलसीबी पथकांकडून तिघांना अटक; दोन पिस्तूल व चार जिवंत काडतूस जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील गुन्हेगारीवर पोलिसांनी चांगलीच टाच आणली आहे. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून ते १४ मेपर्यंत पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्हाभरात क्रॅकडाऊन मोहिमेदरम्यान केलेल्या विविध कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांना चांगले यश आले आहे. सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व विठ्ठल घोगरे यांच्या पथकानी वेगवेगळ्या ठिकाणाहून दोन पिस्तुल आणि चार जिवंत काडतूस जप्त केले आहे. यावेळी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी वरिष्ठांच्या सूचनेनुसार सहायक पोलीस निरीक्षक रवि वाहुळे व विठ्ठल घोगरे त्यांच्या टिमला गोपनीय माहिती काढून अवैध अग्नीशस्त्र बाळगणार्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

दि. १३ मे २०२६ रोजी पेट्रोलिंग दरम्यान सपोनि रवि वाहुळे व त्यांचे पथकातील अंमलदार यांना नवा मोंढा नांदेड परिसरात दोन युवक गावठी पिस्तुल बाळगून असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने मिळालेल्या माहितीप्रमाणे नवा मोंढा, नांदेड परिसरात छापा कार्यवाही केली असता चंद्रशेखर देवराव पाईकराव आणि प्रशिक दिलीपराव ओढणे दोघे रा. संघसेन नगर, इतवारा, नांदेड यांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस सापडल्याने ते जप्त केले. मुद्देमालासह रवी वावळे यांनी दोघांनाही शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. सदरचे आरोपी हे पोलीस स्टेशन विमानतळ हद्दीत खुनाचा प्रयत्न असा गुन्हा करून फरार झाले होते. त्यांच्यावर नांदेड पोलीस पथके पाळत ठेवुन होती. सदर आरोपीतांवर मोक्का अंतर्गत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पीआय भोसले यांनी सांगितले आहे. (पान ३ वर...)

## आता राखीव प्रवर्गातील सवलतींचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना खुल्या जागांवर दावा सांगता येणार नाही

**मुंबई (प्रतिनिधी)–** सरकारी नोकरीत आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. आरक्षणाची सवलत घेतलेल्या उमेदवारांना आता खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. तसा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती आहे.

वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधीची सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार आहे. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. मात्र राखीव प्रवर्गातून अर्ज आणि शुल्क भरलं असेल आणि कुठल्याही राखीव प्रवर्गाचा लाभ घेतला नसेल तर खुल्या प्रवर्गातून नियुक्ती होईल. या आधी आरक्षणाच्या संबंधित स्पष्ट धोरण नसल्याने हा विषय अनेकवेळा सर्वोच्च न्यायालयात गेला होता. त्यामुळे राज्य सरकारने केंद्राच्या आणि गुजरातच्या धर्तीवर असा निर्णय घेतल्याची माहिती आहे. महाराष्ट्रात सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण धोरण हे उभे आरक्षण आणि आडवे आरक्षण अशा दोन स्तरांवर लागू होते. २०२४ मध्ये मराठा समाजासाठी स्वतंत्र (एसईबीसी) प्रवर्गांतर्गत १०% आरक्षणाचा कायदा करण्यात आला असून, त्यानुसार राज्यातील एकूण उभे आरक्षण वाढले आहे.


## पुणे विभागातील दुहेरीकरण कामामुळे काही गाड्यांच्या मार्गात बदल

**नांदेड (प्रतिनिधी)–** मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील अकोलनेर अहिल्यानगर निंबळक यादरम्यान दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत नॉन- इंटरलॉकिंग (एनआय) काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे काही रेल्वे गाड्यांच्या मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.



यामध्ये गाडी क्रमांक १७६२९ हडपसर नांदेड एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे रोजी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोडपरभणीपूर्णा मार्गे धावेल. गाडी क्रमांक १७६३० नांदेड-हडपसर एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे रोजी पूर्णा-परभणी-लातूररोड-कुर्डुवाडी-दौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक १७३२३ हुबळी-बनारस एक्सप्रेस ही १५ मे रोजी सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११०२५ पुणे-अमरावती एक्सप्रेस ही १६, १७ व १८ मे रोजी पुणे-दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-पूर्णा-अकोला मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११०२६ अमरावती- पुणे एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे रोजी अकोला-पूर्णा-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-दौंड-पुणे मार्गे धावेल. गाडी क्रमांक १२६२७ बैंगलोर-नवी दिल्ली एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे रोजी सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे धावेल. गाडी क्रमांक २०६५७ हुबळी-निजामुद्दीन एक्सप्रेस ही १५ मे रोजी सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे धावेल. गाडी क्रमांक २०६५८ निजामुद्दीन-हुबळी एक्सप्रेस ही १७ मे रोजी मनमाड-छत्रपती संभाजीनगर-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-सोलापूर मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे रोजी जन्कम पेठ-पूर्णा-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-दौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस ही १६ व १७ मे रोजी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-पूर्णा-जन्कमपेठ मार्गे धावेल.


प्रवासापूर्वी गाड्यांच्या वेळापत्रकाची व मार्गातील बदलांची माहिती रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा चौकशी केंद्रातून तपासून घ्यावी. यात्रेकरूंनी सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




# 'स्वारातीम' विद्यापीठाच्या महत्त्वाच्या पदांवर नियुक्त्या जाहीर

### कुलसचिवपदी डॉ. ज्ञानेश्वर पवार; उप-परिसर, लातूर संचालकपदी डॉ. शिवप्पा नागोबा तर नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य संचालकपदी डॉ. शैलेष वाढेर

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे कुलसचिव, संचालक उप-परिसर, लातूर तसेच नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य संचालक या महत्त्वाच्या प्रशासकीय पदांसाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीनंतर नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. दि. १३ मे २०२६ रोजी या नियुक्त्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली.



विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार यांची कुलसचिव पदावर नियुक्ती करण्यात आली असून, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. शैलेष जयंतीलाल वाढेर यांची नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य संचालक पदावर तर डॉ. नागोबा शिवप्पा नरसिंग यांची उप-परिसर, लातूर संचालक पदावर निवड करण्यात आली आहे.

डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार हे विद्यापीठाच्या गणितशास्त्र संकुलातील ज्येष्ठ प्राध्यापक असून अध्यापन व संशोधन क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी गणितशास्त्र संकुलाचे संचालक म्हणूनही प्रभावीपणे जबाबदारी सांभाळली आहे. तसेच व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद यांसारख्या विविध अधिकार मंडळांवर सदस्य म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

उप-परिसर, लातूर संचालकपदी नियुक्त झालेले डॉ. नागोबा शिवप्पा नरसिंग यांना शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील तब्बल ३५ वर्षांचा अनुभव आहे. ते विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्टडीजचे चेअरमन म्हणूनही कार्यरत असून विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ उप-परिसराच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय विकासासाठी होणार असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान,डॉ.शैलेषजयंतीलाल वाढेर हे विद्यापीठाच्या औषध निर्माणशास्त्र संकुलात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी शैक्षणिक तसेच प्रशासकीय क्षेत्रात विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या असून विद्यापीठातील अनेक समित्यांवर प्रभावी योगदान दिले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठातील नवोपक्रम, संशोधन व उद्योग-साहचर्य उपक्रमांना अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विद्यापीठातील या नव्या नियुक्त्यांमुळे शैक्षणिक, संशोधन आणि प्रशासकीय कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना विद्यापीठ वर्तुळातून व्यक्त होत आहे.

## व्हीडी सतीशन केरळचे नवे मुख्यमंत्री

**तिरूअनंतपुरम (प्रतिनिधी)–** काँग्रेस नेते व्ही. डी. सतीशन (वय ६१) हे केरळचे मुख्यमंत्री असतील. निकाल जाहीर झाल्यानंतर १० दिवसांनी, दि. १४ मे रोजी काँग्रेसने ही घोषणा केली. सतीशन हे परवूर मतदारसंघाचे आमदार आहेत. केरळच्या मुख्यमंत्रीपदासाठी के. सी. वेणुगोपाल, रमेश चेन्नीथला आणि व्ही. डी. सतीशन या तीन नावांचा विचार केला जात होता. काँग्रेसच्या हायकमांडने सतीशन यांच्या नावाला मंजुरी दिली. अलाप्पुझा लोकसभा मतदारसंघाचे खासदार के. सी. वेणुगोपाल हे केरळच्या मुख्यमंत्रीपदासाठी राहुल गांधींची पहिली पसंती असल्याचे वृत्त होते. राहुल गांधींनी ११ मे रोजी दिल्लीत वेणुगोपाल यांची खासगी भेटही घेतली होती.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# डोळे उघडा, 'नीट' पाहा!

आपल्या देशामध्ये पेपरफुटी हे ढगफुटी सारखी झाली आहे. दहावी वर्गापासून ते विद्यापीठ परीक्षांपर्यंत कोणता पेपर कधी फुटेल हे सांगता येत नाही. यामुळे काहीजणांच्या घरांमध्ये नोटांचा पाऊस पडतो, परंतु विद्यार्थ्यांचे आयुष्य मात्र त्यात वाहून जातं. दुर्दैव म्हणजे याबद्दल शासनाला गांभीर्य नाही. असाच प्रकार नीट परीक्षेबद्दल झाला आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा मार्ग ठरवणारी नीट परीक्षा पुन्हा एकदा पेपरफुटीच्या वादात सापडली आहे. ही घटना केवळ एका परीक्षेतील गैरव्यवहार नाही, तर देशातील स्पर्धा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाला लागलेला मोठा तडा आहे. तब्बल २३ लाख विद्यार्थ्यांनी दिलेल्या या परीक्षेभोवती निर्माण झालेला संशय हा विद्यार्थ्यांच्या गुणांचा किंवा प्रवेशांचा प्रश्न राहिलेला नाही; तो आता न्याय, प्रामाणिकपणा आणि व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा प्रश्न बनला आहे. २०२४ मधील वादानंतर राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीएने झिरो टॉलरन्स आणि फुलप्रूफ व्यवस्था अशा मोठमोठ्या घोषणा केल्या होत्या, पण त्या राजकीय आश्वासनासारख्या हवेमध्ये बाष्पीभूत झाल्या. विद्यार्थ्यांना व पालकांना आश्वासन देण्यात आले होते की, यापुढे कोणतीही त्रुटी होणार नाही. मात्र वर्ष उलटत नाही तोच पुन्हा पेपरफुटीच्या आरोपांनी व्यवस्थेची पोलखोल केली आहे. केरळ आणि राजस्थानमध्ये व्हॉट्सअ‍ॅप गटांवर फिरणाऱ्या 'गेस पेपर'मधील जवळपास शंभर प्रश्न मूळ प्रश्नपत्रिकेशी जुळत असल्याचे समोर आले. हे प्रकार एखाद्या व्यक्तीचे स्वतंत्र कृत्य नसून, परीक्षाभोवती उभ्या राहिलेल्या संघटित गुन्हेगारी साखळीचे द्योतक आहेत. या काळ्या बाजाराचे भयावह रूप अधिक चिंताजनक आहे. सुरुवातीला काही हजार रुपयांत मिळणारे पेपर पुढे लाखो रुपयांत विकले जाऊ लागल्याच्या चर्चा आहेत. काही कुटुंबांनी २० ते २५ लाख रुपये मोजल्याचे आरोप होत आहेत. म्हणजेच शिक्षणातील गुणवत्ता, परिश्रम आणि प्रामाणिकता यांची किंमत आता पैशाच्या जोरावर ठरवली जात आहे. एकीकडे विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करून यश मिळवण्याचा प्रयत्न करतात, तर दुसरीकडे काही जण बंद खोलीत पैशांच्या जोरावर भवितव्य विकत घेतात. ही स्थिती केवळ अन्यायकारक नाही, तर देशाच्या सामाजिक नैतिकतेलाही हादरा देणारी आहे. या प्रकरणातील सर्वात वेदनादायी बाब म्हणजे संस्थात्मक असहायता. घटना उघडकीस आल्यानंतर अधिकाऱ्यांनी माफी मागितली, चौकशा जाहीर केल्या आणि कारवाईचे आश्वासन दिले. परंतु परीक्षा झाल्यानंतर, विद्यार्थ्यांचे भविष्य अनिश्चिततेत ढकलल्यानंतर मागितलेली माफी कितपत उपयोगाची? प्रत्येक वेळी बैल गेला आणि झोपा केला अशी भूमिका घेतली जाते. हीच व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे. परीक्षा प्रणाली प्रतिबंधात्मक न राहता प्रतिक्रियात्मक बनली आहे. घोटाळा झाला की लोकांना भुरळ घालण्यासाठी चौकशी जाहीर केली जाते, चौकशी झाली की आश्वासने आणि काही दिवसांनी त्याचा सोयीस्कर विसर पडतो आणि पुन्हा नव्या घोटाळ्याची पुनरावृत्ती होत राहते. हे दुष्टचक्र थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. आधीच आपल्या देशात आरक्षणाचा बडगा उभारला गेल्यामुळे हुशार विद्यार्थी देश सोडून जात आहेत, परंतु दुसऱ्या देशात सुद्धा सध्या चांगली परिस्थिती राहिली नाही. यालाच म्हणतात आई जेवायला देईना, बाप भीक मागू देईना. नीट परीक्षेचे महत्त्व लक्षात घेतले तर ही समस्या अधिक गंभीर वाटते. मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीय कुटुंबांसाठी ही परीक्षा म्हणजे केवळ शैक्षणिक कसोटी नसून संपूर्ण कुटुंबाच्या स्वप्नांचा जुगार असतो. विद्यार्थी आपले बालपण आणि तारुण्य कोचिंग क्लासच्या चार भिंतीत घालवतात. पालक कर्ज काढतात, बचत खर्च करतात आणि मानसिक ताण सहन करतात. अशा परिस्थितीत जर परीक्षा प्रक्रियेवरच संशय निर्माण झाला, तर विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि पालकांच्या त्यागाचे मोल काय उरते? या पार्श्वभूमीवर आता केवळ वरवरच्या सुधारणा करून चालणार नाही. परीक्षा व्यवस्थेची संपूर्ण रचना बदलण्याची वेळ आली आहे. प्रश्नपत्रिका निर्मितीपासून वितरणापर्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सायबर सुरक्षा, जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई आणि पारदर्शक चौकशी या गोष्टी अपरिहार्य आहेत. त्याचबरोबर परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्ट साखळी मोडून काढण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीही तितकीच महत्त्वाची आहे. देशाच्या भविष्यास आकार देणाऱ्या परीक्षा जर संशयाच्या भोवऱ्यात अडकल्या, तर विद्यार्थ्यांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास ढासळेल. शिक्षण ही संधी समानतेची वाट असावी; ती पैशाच्या बाजारात विकली जाणारी वस्तू होऊ नये. नीट पेपरफुटी हा केवळ परीक्षा घोटाळा नाही, तर देशाच्या नैतिक आरोग्याची धोक्याची घंटा आहे. आता तरी शासन आणि संबंधित संस्थांना डोळे उघडा नीट पाहा असा सल्ला दिला गेला पाहिजे.

# 'नीट' परीक्षेची विश्वासार्हता आणि भवितव्य



नॅशनल टेस्टिंग एजन्सी द्वारे देशभरातील सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांनी ३ मे २०२६ ला नीट ची परीक्षा दिली होती. ही परीक्षा देशभरातील १५५ शहरात घेण्यात आली, तर राज्यातील जवळपास अडीच लाख विद्यार्थी या परीक्षेस बसले होते. मात्र या परीक्षेच्या पेपर फुटीचा प्रकार उजेडात आल्यानंतर राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेवर,ही परीक्षा रद्द करण्याचे करण्याची नामुष्की ओढवली. एवढ्या मोठ्या प्रमाणात घेतल्या जाणाऱ्या परीक्षेचा पेपर फुटण्याचा प्रकार पहिल्यांदा झाला नसून; यापूर्वी मागील दहा वर्षात ८९ वेळा नीट परीक्षेचा पेपर लिक झालेला आहे. तर ४८ वेळा पुनर्परीक्षा घेण्याचा प्रसंग संस्थेवर आला होता. यापूर्वी २०२४ मध्ये ही पेपर लिक झाला परंतु, त्यावेळेस पुनर्परीक्षा घेण्यात आली नव्हती. यंदाच्या पेपर फुटीने यापूर्वीचे सर्व रेकॉर्ड मोडून काढले आहे. अवांतर पेपर फुटीच्या प्रकरणावर कायदेशीर चाप बसविण्यासाठी; सरकारने देशात 'अँटी पेपर लीक' हा कठोर शिक्षेचा व दंडात्मक कायदा आणला होता. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर पेपर फुटीच्या प्रकरणाला आळा बसेल असे वाटले होते. परंतु भ्रष्टाचाराची पाळेमुळे इतकी खोल रुजली गेली आहे की, त्यापुढे आता कायदेही निष्प्रभ ठरत आहे.

देशात शिक्षणाचे व्यावसायिकरण मोठ्या प्रमाणात होत असताना परीक्षेचे बाजारीकरण झालेले दिसते.देशातील नागरिकांचे सार्वजनिक स्वास्थ जपणाऱ्या वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेश परीक्षांचे पेपर परीक्षेच्या चाळीस-पन्नास तास अगोदर लाखो रुपयात फुटत आहे. परीक्षा संस्थेच्या अनियोजन व भ्रष्ट नीतीमुळे पेपर लीक होत आहे. परिणामी याचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या भवितव्य,मानसिक स्थिती आणि परीक्षेच्या विश्वासार्हतेवर परिणामकारक ठरते. नीट ची परीक्षा ही अत्यंत काटेकोरपणे कडक नियमांच्या चौकटीत एकाच वेळी देशभरात घेतली जाते. तिच्या प्रबंधनासाठी स्वतंत्र संस्था अस्तित्वात आहे. सर्व काही चाकोरीबद्ध असताना वारंवार पेपर लिक कसा होतो? पेपर लिक करणारे,झारीतले शुक्राचार्य कोण? यांच्या मुळाशी यंदा तरी पोहोचणार की, पुढील परीक्षेला 'ये रे माझ्या मागल्या' अशी अवस्था कायम राहील. लीक झालेले पेपर पुन्हा घेता येईल. परंतु विद्यार्थी पुनर्परीक्षेच्या मानसिकतेसाठी पूर्वीसारखे तयार होत नसतात. दोन वर्ष अथक मेहनत घेऊन ग्रामीण भागातून शहराकडे महागड्या शिकवणी वर्गात प्रवेश घेऊन नीट च्या परीक्षेत बसलेले असतात. वेळोवेळी पेपर लीक होण्याच्या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होतो. उच्च शिक्षणाबाबत लक्ष विचलित होते.कधीही न भरून निघणारे एक प्रकारचे मानसिक नुकसान होत असते. पुनर्परीक्षा होतील परंतु, विद्यार्थ्यांचे आर्थिक व मानसिक नुकसान झाले त्याचे काय?

नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणानंतर विद्यार्थ्यांच्या मनात व त्यांच्या पालकात मोठ्या प्रमाणात संभ्रम आणि उदासीनतेचे वातावरण आहे. राजकीय पातळीवर देशात विरोधी पक्षांचे नेते परीक्षा धोरण व शासनावर टीका करत आहे. सदर परीक्षेचा पेपर लीक झाल्यानंतर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने सीबीआय कडे चौकशी सोपविली आहे. या पेपर लीक चे कनेक्शन महाराष्ट्रसह देशातील विविध राज्यात जोडलेले दिसते. तपासाअंती काही म्होरके सापडतील. परंतु पुढील वेळी मागील प्रमाणे परिस्थिती ओढावणार नाही, याची हमी कोण देईल. परीक्षेची पारदर्शकता, विश्वासार्हता विद्यार्थ्यांचे मानसिक बळ एकवटणे आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी कार्य करणे जादूची कांडी फिरवल्यासारखे निश्चितच ठरत नाही. पेपर लीक प्रकरणातील दोषींना पिंजून काढणे व जलद गतीने शिक्षा देणे, अँटी पेपर लीक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे. या पुढील परीक्षा अधिक पारदर्शक, विश्वासार्ह, वैद्यकीय प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य त्यांच्या मेहनीतीच्या संरक्षणासाठी आश्वासक कार्य करेल. अशी व्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे. अर्थात वेळ कमी आणि प्रभावी अंमलबजावणी करणे अति महत्त्वाचे राहील.

-शशिकांत म. तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
मो. ९१३०८३५४५८

# कुटुंब : समाजजीवनाचा सशक्त आधार

मानव हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. समाजात राहून, परस्परांशी संवाद साधून आणि नातेसंबंध जपत तो आपले जीवन समृद्ध करतो. या सामाजिक जीवनाचा पाया म्हणजे कुटुंब. व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत तिच्या जीवनाला आकार देणारी, संस्कारांची शिदोरी देणारी आणि संकटसमयी आधार देणारी सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे कुटुंब होय. जगभरात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत असताना कुटुंब संस्थेचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ मे हा दिवस 'आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने १९९३ मध्ये हा दिवस घोषित केला आणि १९९४ पासून जगभरात त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या दिवसामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे कुटुंब संस्थेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करणे, कुटुंबांसमोरील समस्या समजून घेणे आणि कुटुंबव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी समाज व शासन यांना जागृत करणे होय.

भारतीय संस्कृतीत कुटुंबाला अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना भारतीय परंपरेतूनच जगाला मिळाली आहे. संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे, अशी व्यापक भावना भारतीय संस्कृती जोपासते. त्यामुळेच भारतीय समाजात कुटुंब ही केवळ राहण्याची व्यवस्था नसून ती भावनिक, नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणारी जीवनपद्धती मानली जाते. आई-वडील, आजी-आजोबा, भाऊ-बहिण, नातेवाईक आणि इतर सदस्य यांच्यातील प्रेम, जिव्हाळा, सहकार्य आणि त्याग या मूल्यांमुळे कुटुंब अधिक दृढ बनते. कुटुंब ही व्यक्तीच्या भावविश्वाची पहिली शाळा असते. बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासाची सुरुवात कुटुंबातूनच होते. बोलणे, चालणे, वागणे, इतरांशी संबंध ठेवणे, संस्कार, नैतिकता, शिस्त, सहकार्य, आदर, कर्तव्यभावना आणि सामाजिक जबाबदारी यांचे प्राथमिक शिक्षण बालकाला कुटुंबातून मिळते.

कुटुंब संस्थेचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. मानवाच्या आदिम जीवनात संरक्षण, अन्न, सुरक्षितता आणि प्रजनन या गरजांमधून कुटुंबव्यवस्थेची निर्मिती झाली. कालांतराने समाजरचना बदलत गेली आणि कुटुंबसंस्थाही विकसित होत गेली. प्राचीन काळात संयुक्त कुटुंब पद्धतीला विशेष महत्त्व होते. एकाच घरात अनेक पिढ्या एकत्र राहून परस्पर सहकार्याने जीवन जगत असत. या पद्धतीत आर्थिक सुरक्षितता, मुलांचे संगोपन, वृद्धांची काळजी आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन सहज शक्य होत असे. आधुनिक काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण, स्थलांतर, शिक्षणाचा प्रसार आणि



व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनांमुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढू लागली. आज बहुसंख्य कुटुंबे आई-वडील आणि मुलांपुरती मर्यादित झालेली दिसतात. तथापि, कुटुंबाचे स्वरूप बदलले असले तरी त्याचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही.

आजच्या डिजिटल युगात कुटुंबसंस्थेसमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. मोबाईल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांचा अतिरेकी वापर यामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद कमी होत आहे. एकाच घरात राहूनही सदस्य एकमेकांपासून मानसिकदृष्ट्या दूर जात असल्याचे चित्र दिसते. कामाचा वाढता ताण, व्यस्त जीवनशैली आणि स्पर्धात्मक वातावरण यांमुळे कुटुंबासाठी वेळ देणे कमी झाले आहे. अनेकदा संवादाचा अभाव, गैरसमज, अपेक्षाभंग आणि आर्थिक ताण यांमुळे कौटुंबिक कलह निर्माण होतात. घटस्फोटांचे वाढते प्रमाण, कौटुंबिक हिंसा, व्यसनाधीनता आणि मानसिक आरोग्याच्या समस्या यांमुळे कुटुंबव्यवस्था अस्थिर होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये जनजागृती कार्यक्रम, परिसंवाद, कार्यशाळा आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जातात. कुटुंब कल्याण, महिलांचे सक्षमीकरण, बालहक्क, वृद्धांची सुरक्षा आणि मानसिक आरोग्य यांसारख्या विषयांवर चर्चा केली जाते. संयुक्त राष्ट्र संघ दरवर्षी या दिनासाठी विशिष्ट संकल्पना जाहीर करतो. या संकल्पनांमधून कुटुंबसंस्थेच्या विविध पैलूंवर जागतिक स्तरावर लक्ष केंद्रित केले जाते. शाश्वत विकास, लिंग समानता, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक समावेशकता यांसारख्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

भारतातील कुटुंबव्यवस्थेची काही वैशिष्ट्ये विशेष उल्लेखनीय आहेत. भारतीय कुटुंबांमध्ये नातेसंबंधांना मोठे महत्त्व दिले जाते. परस्पर आदर, मोठ्यांचा सन्मान, लहानांवर प्रेम आणि सामूहिक निर्णय प्रक्रिया या मूल्यांमुळे भारतीय कुटुंबव्यवस्था मजबूत राहिली आहे. ग्रामीण भागात अजूनही संयुक्त कुटुंब पद्धतीचे अस्तित्व काही प्रमाणात दिसून येते. तथापि, बदलत्या सामाजिक परिस्थितीत कुटुंबव्यवस्थेतही परिवर्तन होत आहे. महिलांचे शिक्षण, रोजगार, स्थलांतर आणि शहरीकरण यांमुळे पारंपरिक भूमिकांमध्ये बदल होत आहेत. या बदलांना सकारात्मक दृष्टीने स्वीकारून समतोल आणि संवेदनशील कुटुंबव्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

आजच्या काळात कुटुंबातील संवादाचे महत्त्व अधिक वाढले आहे. संवाद हा कोणत्याही नात्याचा आत्मा असतो. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. मतभेद असले तरी परस्पर आदर आणि संयम राखणे गरजेचे आहे. अनेक समस्या संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. त्यामुळे दररोज काही वेळ एकत्र घालवणे, चर्चा करणे, जेवण एकत्र घेणे आणि कुटुंबीयांच्या सुख-दुःखात सहभागी होणे यामुळे नात्यांमध्ये दृढता येते.

मानसिक आरोग्य आणि कुटुंब यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. ज्या व्यक्तीला कुटुंबाचा आधार मिळतो, ती व्यक्ती मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम राहते. प्रेम, विश्वास आणि सहकार्य यांमुळे व्यक्तीच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते. उलटपक्षी, कौटुंबिक तणाव, हिंसा किंवा दुर्लक्ष यांमुळे नैराश्य, चिंता आणि मानसिक विकार निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या भावनांचा आदर करणे आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन हा केवळ एक औपचारिक उत्सव नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण आपल्या कुटुंबासाठी किती वेळ देतो? कुटुंबातील सदस्यांच्या भावना कितपत समजून घेतो? वृद्ध, महिला आणि मुलांच्या गरजांकडे किती संवेदनशीलतेने पाहतो? या प्रश्नांचा विचार या निमित्ताने होणे आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैलीत भौतिक सुखसोयी वाढल्या असल्या तरी नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होत असल्याचे दिसते. त्यामुळे कुटुंबातील प्रेम, संवाद आणि सहजीवन यांना नव्याने बळ देणे ही काळाची गरज आहे.

शासन स्तरावरही कुटुंबसंस्थेला बळकटी देण्यासाठी विविध योजना आणि धोरणांची आवश्यकता आहे. महिलांचे संरक्षण, बालहक्क, वृद्धकल्याण, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि रोजगार निर्मिती या माध्यमातून कुटुंबांचे जीवनमान सुधारता येऊ शकते. कौटुंबिक समुपदेशन केंद्रे, महिला सहाय्यता केंद्रे आणि मानसिक आरोग्य सेवा यांचा विस्तार करणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य सुविधांची उपलब्धता वाढविणे गरजेचे आहे.

ग्रामीण समाजात कुटुंबव्यवस्था अजूनही सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. शेती, सण-उत्सव, सामाजिक कार्यक्रम आणि परंपरा यांमुळे कुटुंबातील सदस्य एकत्र राहतात. परंतु ग्रामीण भागातही स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक संकट यांमुळे कुटुंबसंस्थेवर परिणाम होत आहे. त्यामुळे ग्रामीण विकास, रोजगारनिर्मिती आणि शिक्षणाच्या संधी वाढविणे आवश्यक आहे.

आदिवासी समाजातील कुटुंबव्यवस्था देखील अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामूहिकता, निसर्गाशी जवळीक आणि परस्पर सहकार्य ही त्यांची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. तथापि, आधुनिकतेच्या प्रभावामुळे आणि आर्थिक बदलांमुळे त्यांच्या पारंपरिक जीवनपद्धतीत बदल होत आहेत. आदिवासी कुटुंबांचे सामाजिक आणि सांस्कृतिक संरक्षण करणे हे देखील समाजाचे कर्तव्य आहे.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की समाजाच्या प्रगतीचा पाया सुदृढ कुटुंबव्यवस्थेत आहे. व्यक्ती घडली तर कुटुंब घडते आणि कुटुंब घडले तर समाज व राष्ट्र मजबूत होते. प्रेम, संवाद, परस्पर आदर, समानता आणि सहकार्य या मूल्यांवर आधारित कुटुंबव्यवस्था निर्माण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आधुनिकतेच्या प्रवाहात पारंपरिक मूल्यांचे जतन करताना नव्या विचारांना स्वीकारणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार कुटुंबाचे स्वरूप बदलत असले तरी त्याची गरज आणि महत्त्व कायम राहणार आहे.

१५ मे रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला कुटुंबाच्या या अनमोल मूल्यांची आठवण करून देतो. या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील नात्यांना अधिक दृढ करण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रेम, विश्वास, समता आणि सहकार्य यांच्या आधारावर उभे राहिलेले कुटुंबच सुदृढ समाज आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करू शकते. म्हणूनच कुटुंब ही केवळ सामाजिक संस्था नसून मानवी जीवनाचा आत्मा आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

-डॉ. राजेंद्र बगाटे,
हिंगोली
मो.९८६०१०३५

# जोडीदारही करु शकतो आपल्या बाळांवर संस्कार ?

जोडीदारही करु शकतो आपल्या बाळांवर संस्कार, होय. जोडीदार आपल्या बाळावर संस्कार करु शकतो. परंतु जोडीदार तसाच हवा. तो जर दारु पित असेल, व्याभिचारात लिप्त असेल तर त्याची मुलं अवश्य बिघडतात. ती एवढी बिघडतात की नशेच्या आहारी जातात व आपल्याच जीवनाचं बरंवाईट करुन टाकतात.

एक इंजिनियरींग कॉलेज. ज्या कॉलेजमध्ये प्रसन्नवर्धक जागा. मुलांच्या तासिका होत होत्या का तर माहीत नाही. सर्व मुलं मैदानावर बसली होती झाडाच्या खाली. तसा उन्हाळा व कडक उन्हं. मुलांचं झाडाखाली बसणं. कडक उन्हाळ्यामुळे झाडाचा आसरा. मग गोविंदानं परिस्थिती विचारात न घेता त्या मुलांना विचारलं, आपण असे झाडाखाली बसले आहात. तासिका नाही का आपल्या?

तो गोविंदाचा प्रश्न. त्यावर एक मुलगा म्हणाला, सर, शिकवीतच नाहीत वर्गात. का बरं? पंखेच आहेत सर. किती उकडतंय वर्गात. या झाडाखाली तरी बरं वाटतंय. त्या मुलांची उत्तरं. तशी त्याची बरीच कारणं असतील व पहिलं कारण असेल, विद्यावेतन. जे अतिशय अल्प असेल. मग जॉब करणारी मुलं संसाराला लागणारी मिळकत कमविण्यासाठी कुठेही खाजगी ठिकाणी कामे करतात व पैसे कमवितात. मग ते अशा ठिकाणी पार्ट



टाईम जॉब करतांना कधी उशिरा पाशिरा येतात तर कधी येतच नाही. त्यांना विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी काही घेणंदेणं नाही आणि इंजिनियरींग महाविद्यालय का असेना. परंतु त्यांनाही केवळ पैसेच कमविण्याशी मतलब असतो. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी नाही. राहिला निकाल. तर निकालात गुण चांगलेच मिळतात. ते कॉलेजवर अवलंबून असतं. कारण परिक्षा कॉलेजच्याच असतात. गुण टाकणारेही कॉलेजचेच. आता राहिला नोकरीचा प्रश्न. तर काही मुलं आजच्या काळात मोबाईलमधून अभ्यास करतात. काही वेगळी शिकवणीही लावतात. ज्यातून त्यांना गुण जास्त मिळतात. अशा होतकरु मुलांसाठी खाजगी कंपन्या येतात. ज्या कंपन्यांना मुलांची गरज असते. ज्यांची महाविद्यालयाशी साठगाठ असते. परंतु बाकी विद्यार्थ्यांचं काय? त्यांना तर प्रात्यक्षिक स्वरुपाचा अनुभवच नसतो. मग अशी मुलं इंजिनियरींगची पदवी तर कमवतात. परंतु ते जागतिक स्तरावर स्पर्धेत प्रॅक्टीकल ज्ञान नसल्यानं टिकू शकतात का? याचंही उत्तर नाही असंच आहे.

परीसराचं निरीक्षण करतांना गोविंदानं पाहिलं की चार पाच मुलांमध्ये एक मुलगी होती व ती मुलगी एक मुलाच्या मांडीवर झोपली होती अगदी निवांतपणे. कदाचीत तो तिचा प्रियकर असेल. मग गोविंदाच्या चर्चा सुरु झाल्या. हे असं का? त्यावर दुसऱ्यानं उत्तर दिलं. यात तिच्या आईवडिलांचा दोष? मुलगी पळून जाते, तेव्हा आईवडील ओरडतात. परंतु ती घरी उशिरा येत असेल तर आईवडीलानं विचारायला हवं की तिला का वेळ झाला. तसंच ती एखाद्यावेळेस एखाद्या दिवशी नेहमीच्या जेवनापेक्षा कमी जेवत असेल, तर तिला विचारायला हवं की तू नेहमीच्या जेवनापेक्षा आजच का कमी जेवली. हे तेच मायबाप विचारु शकतात. जे त्यालायक असतात. जे दारु पिवून घरी येत असतील. जी बाई आपला पती असतांना दुसऱ्याच पराया माणसांसोबत आपल्या मुलांसमोर रंगरलिया साजऱ्या करायला जात असेल किंवा त्यांची किरकोळ कारणांवरून सतत भांडणं होत असतील तर ती आई वा ते वडील आपल्या मुलांना, ती कुठं गेली होती. ती का कमी जेवली. हे विचारुच शकत नाही. विचारण्याचा त्यांना हक्क नसतेच. अन् समजा एखाद्यावेळेस एखाद्यानं विचारलंच तर मुलांचं त्यांना उलट उत्तर असतं, 'आपलंच पाहा' मग मुलांसमोर आईवडिलांना चक्क चूप बसावं लागतं. आता ही मुलगी त्या सर्व मुलांमध्ये एकटीच असून तिचं त्या मुलाच्या मांडीवर झोपणं. असं दर्शवते की त्या व्यक्तीचं बरोबर होतं. कदाचीत तिच्या आईवडिलांचं तिच्याकडं लक्ष नव्हतं. कारण तो व्यक्ती जर तसं बोलला तर तो अनुभवावरुन बोलला असावा. महत्वाचं सांगायचं झाल्यास अनुभव हाच गुरु. त्यानुसार आजच्या काळात मुलं घडत असतात. परंतु घरी जर आपण भांडणं होत असतील, आईवडील भांडत असतील, वडील दारुडे असतील. तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर किंवा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर होतो. असं होवू नये म्हणून घरी वडिलांनी सुधरावं. दारु पिवू नये. त्यातच भांडणं करु नये म्हणजे झालं. शिवाय आई व वडिलांनीही अनैतिक कामेही करु नये. तसंच कुटुंब म्हटलं तर भांडणं आलीच. परंतु अशी भांडणं करायची झाल्यास तिही आपल्या पाल्यांच्या समक्ष करु नये की ज्याचा परिणाम भविष्यात त्यांच्याच मुलांवरच होईल. मुलं बिघडतील. ती नशेच्या आहारी जातील. कोणी मांडीवर झोपतील. कोणी रेस्टॉरंटमध्ये जातील तर कोणी पळून. ज्यातून ती मुलं बलात्काराचे शिकार ठरतील. कोणाच्या किडन्या वा मानवी अवयव काढले जातील तर कुणाचा किरकोळ गोष्टीसाठी खुन केला जाईल तर कुणी खुनही करतील. एकंदरीत सांगायचं झाल्यास प्रत्येक मुलगा हा आपल्या जीवनाची राखरांगोळी स्वतःच करतील, यात शंका नाही.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# आंतरराष्ट्रीय योग दिनाला उपस्थित राहण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

## नित्ययोग सेवा समितीच्या प्रयत्नाला यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिना दिवशी नांदेड येथे नित्ययोग सेवा समितीने आयोजित केलेल्या योग शिबिरास आपण उद्घाटक म्हणून आवर्जून उपस्थित राहू, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. नित्ययोग सेवा समितीच्या शिष्टमंडळाने त्यांच्या मुंबई येथील आनंदवन या निवासस्थानी बुधवार, दि. १३ रोजी भेट घेतली. यावेळी त्यांनी शिष्टमंडळाशी संवाद साधला.

नित्य योग सेवा समितीच्या वतीने नांदेड येथे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. योगाचार्य नांदेड योग रत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली किमान ५० हजार योग साधक उपस्थित राहतील अशा तयारीने समितीच्या वतीने युद्ध पातळीवर तयारी सुरू असून, भव्य अशा योग शिबिरास उद्घाटक म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती लाभणार आहे.



या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री शिंदे यांना आमंत्रित करण्यासाठी नांदेड उत्तर विधानसभेचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नित्य योग सेवा समितीचे योगाचार्य सीताराम सोनटक्के गुरुजी, आदर्श योग साधक नितीन चव्हाण, विनायक बारहात्ते, महेश सोमनवार, नामदेव वाघमारे आदी शिष्टमंडळ मुंबई येथे गेले होते.

याप्रसंगी मुंबई येथे मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुख्य सचिव श्रीकर परदेशी, राज्याचे मंत्री प्रतापराव सरदेसाई यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मलबार हिल परिसरातील आनंदवन या निवासस्थानी नांदेडच्या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले. याप्रसंगी एकनाथ शिंदे यांनी आपण उद्घाटक म्हणून नांदेड येथे २१ जूनच्या आंतरराष्ट्रीय योग दिनास उपस्थित राहू असे ठोस आश्वासन दिले.

# धनेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीर अभियान; टप्पा एक समाधान शिबिरास प्रतिसाद

## ८७१ सातबारा व ५९१ आठ-अ उताऱ्यांचे वाटप, १२ जणांना संजय गांधी योजनेचा लाभ



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील धनेगाव येथे १४ मे रोजी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले. यावेळी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजना लाभ प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

यावेळी विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या-मुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले.

तहसील कार्यालय नांदेड यांच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. यामध्ये ८७१ ऑनलाईन सातबारा उतारे व ५९१ आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच १२ पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले.

शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या. या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांनी मार्गदर्शन केले. तहसीलदार संजय वारकड यांनी प्रास्ताविकातून अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली. नायब तहसीलदार सुनील माचेवाड यांनी सूत्रसंचालन केले, तर स्वप्नील दिगलवार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. पुरवठा निरीक्षक रवींद्र राठोड यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण केले. तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी उपस्थित राहून अभियानास सहकार्य केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी सय्यद मोसिन अहमद तसेच तलाठी दीपक सोनटक्के, राम मुंडे आणि संजय वानोळे यांनी विशेष योगदान दिले. तसेच मंडळ अधिकारी येलमट्टी संतोष आस्कूलकर व बडवणे, तलाठी मनोज गिरी, जमदाडे व श्रीरामे यांनीही सहकार्य केले. शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# मुदखेड तालुक्यात जनगणना तयारीला सुरुवात

**मुदखेड (प्रतिनिधी)** –देशभरात जनगणना –२०२७ ची तयारी सुरू असून, या जनगणनेचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून, यामध्ये दिनांक ०१ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीमध्ये नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनास नांदेड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

मुदखेड तालुक्यातील आमरापूर/दुधनवाडी व बोरगाव सीता या गावातील नागरिक पुढाकार घेऊन शंभर टक्के स्वगणना करत राष्ट्रीय कार्यात सहभागी झाले आहेत. या गावातील नागरिकांचे प्रशासनाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या गावाचा आदर्श घेऊन तालुक्यातील इतर गावातील नागरिकांनी स्वगणना करावी, असे आवाहन मुदखेडचे तहसीलदार तथा चार्ज अधिकारी आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.



देशभरात जनगणना प्रक्रिया सुरु झाली असून, यासाठी प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रगणक व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या जनगणनेत आत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनास नागरीक उस्फुर्त प्रतिसाद देत आहेत.

नमूद गावातील स्वगणना ही जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर, नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

पर्यवेक्षक श्रीमती सविता पदमवार, आमरापूर/दुधनवाडी येथील प्रगणक श्रीमती छाया पाटील, बोरगाव सीता येथील प्रगणक ठाकूर यांनी जनगणना प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यासाठी फिल्ड ट्रेनर गोविंद शिरुरकर, विद्याधर शेवाळकर, सरपंच नवनाथ कदम, माजी पोलीस पाटील अमरापूर/दुधनवाडी नाईकवाडे, भागवत कोल्हे, ग्राम महसूल अधिकारी गलांडे व जनगणना शाखेतील कर्मचारी उल्हास जवळेकर, तांत्रिक सहायक गोविंद शिंदे यांनी सहकार्य केले आहे.

# ग्रामीण गृहनिर्माणामध्ये नांदेड जिल्हा परिषद राज्यात प्रथम

- तालुकास्तरावर माहूर तालुक्याची राज्यात सर्वोकृष्ट कामगिरी
- आज साताऱ्यात पुरस्काराचे वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)** –ग्रामीण भागातील बेघर व गरजू नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध स्तरावर प्रभावी प्रयत्न करण्यात येत आहेत. या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत नांदेड जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, तालुका स्तरावर माहूर तालुक्याने राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरीचा मान मिळविला आहे.

महाआवास अभियान २०२३-२४ अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. राज्य पुरस्कृत आवास योजनेत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना तसेच मोदी आवास योजना या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत नांदेड जिल्ह्याने उत्कृष्ट कार्य करत राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. त्याचबरोबर आदिवासीबहुल माहूर तालुक्यानेही उत्कृष्ट नियोजन व प्रभावी अंमलबजावणीच्या जोरावर राज्यात सर्वोत्कृष्ट तालुक्याचा बहुमान मिळविला आहे.

या यशामागे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्यांनी वेळोवेळी बैठका घेऊन योजनांचा आढावा घेतला. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी सातत्याने पाठपुरावा करून अभियान गतिमान केले. त्यामुळेच नांदेड जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे.

माहूर तालुक्यातही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. लाभार्थ्यांना वेळेत घरे मंजूर करणे, बांधकाम पूर्णत्वास नेणे आणि शासनाच्या उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता करणे यामध्ये माहूर तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी केली.

या पुरस्कारांचे वितरण शुक्रवार, दि. १५ मे रोजी सैनिक स्कूल, सातारा येथे होणार आहे.








जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले तसेच माहूरचे गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# तहसीलदारांच्या निवासस्थान बांधकामासाठी बिलोलीत जागा भेटेना

- वर्क ऑर्डर येऊन झाले तब्बल दीड वर्ष
- बिलोलीत जागा नाही की प्रशासनाची अनास्था

**बिलोली (प्रतिनिधी)–** तालुक्याचे प्रमुख असलेल्या बिलोली येथील तहसीलदार यांच्या प्रशासकीय निवासस्थान बांधकामांचे गेल्या दीड ते पाऊने दोन वर्षापूर्वी कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात आले. कार्यारंभ आदेश प्राप्त होऊन दीड वर्षाचा काळ लोटला असला तरी महसूल विभागाने संबंधित गुत्तेदारास अद्याप तहसीलदार निवासस्थान बांधकामासाठी जागा दाखवली नसल्याने तहसीलदार निवासस्थान बांधकामांचे घोंगडे भिजत पडले आहे. तालुक्यातील प्रशासकीय विभागाचे प्रमुख असलेल्या तहसीलदारांना आपल्याचं निवासस्थान बांधकामासाठी जागा दाखवता येत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत असून निवासस्थान बांधकामासाठी बिलोली शहरात खरेच जागा उपलब्ध नाही की महसूल विभागाला जागा दाखवायची नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्यांच्या सीमेवर असलेला बिलोली हा तालुका अनेक कारणांनी नांदेड जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. पुरातन दगडी मज्जीद, पुरातन मंदिरामुळे प्रसिद्ध असलेला हा तालुका नैसर्गिक साधन संपत्तीच्या बेसुमार व अतिउत्खननामुळे प्रसिद्ध आहे. विविध कारणांमुळे नेहमीच चर्चेत राहणाऱ्या या बिलोली तालुक्याचे प्रशासकीय प्रमुख पद म्हणजे तहसीलदार तथा दंडाधिकारी हे आहे. दोन राज्यांच्या सीमेवर असणाऱ्या व नेहमीच या ना त्या कारणाने चर्चेत राहणाऱ्या बिलोली येथील प्रशासकीय प्रमुखांना मुख्यालयाच्या ठिकाणीच राहता यावे या उद्देशाने शासनाच्या वतीने तहसीलदार निवासस्थान बांधकामासाठी ७५ लक्ष १८ हजार ८७९ रूपये येवढा निधी मंजूर करण्यात येऊन २० जून २०२४ रोजी बांधकामांचे कार्यारंभ (वर्क ऑर्डर) काढण्यात आले. तहसीलदारांच्या निवासस्थान बांधकामांचे वर्क ऑर्डर देऊन जवळपास तेवीस महिन्यांचा कालावधी लोटला आहे. मात्र बिलोली येथील महसूल विभागाच्या वतीने आजतागायत तहसीलदारांच्या निवासस्थान बांधकामा-साठी जागा उपलब्ध करून दिली नसल्याने निधी व इतर सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवासस्थान बांधकाम सुरू झाले नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.

तालुक्याचे प्रशासकीय प्रमुख असलेल्या तहसीलदार यांच्या निवासस्थान बांधकामासाठी तालुक्याचे मुख्यालय असलेल्या बिलोली शहरात जागा उपलब्ध नाही का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## विष्णुपुरी येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलचा दहावी बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट निकाल

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी ता. जि.नांदेड येथील दहावीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करीत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. शाळेचा एकूण निकाल ८५.८१ टक्के लागला असून, विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावर्षी मार्च २६ संपूर्ण नांदेड जिल्ह्यात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय कडक आणि पारदर्शक कॉपीमुक्त परीक्षा अभियानाची अंमलबजावणी दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेत करण्यात आली. यंदा शाळेतून परीक्षेसाठी एकूण १४१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १२१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्यात २८ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ३९ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ३३ विद्यार्थी तर २१ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

# नांदेड परिमंडलात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेस उत्तम प्रतिसाद

## २०७०३ घरांवर ८०.७९ मेगावॅट निर्मिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांचा समावेश असणाऱ्या महावितरणच्या नांदेड परिमंडलात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत २०७०३ घरांवर ८०.७९ मेगावॅट सौर ऊर्जेची निर्मिती केली जाते. अन्य वीज ग्राहकांनी ७८००० रुपयांपर्यंतचे अनुदान असणाऱ्या योजनेत सहभागी होऊन वीज बिलाच्या कटकटीतून मुक्तता मिळविण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

नांदेड परिमंडलाने एप्रिल २०२६ अखेरपर्यंत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली असून, नांदेड जिल्ह्यात ९७९५ घरांच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसविले आहेत. त्यातून ४०.८९ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होते. परभणी जिल्ह्यात ७६६७ घरांवरून २७.८२ मेगावॅट तर हिंगोली जिल्ह्यात ३२४१ घरांवर बसविलेल्या पॅनल्समधून १२.०८ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होते आहे.

घराच्या छतावरील सौरऊर्जा पॅनलद्वारे झालेली वीजनिर्मिती घरगुती वापरापेक्षा अधिकची असल्यास वीज बील शुन्यावर येईल. सौर ऊर्जेची निर्मिती अधिकची असेल तर ती महावितरणला विकून उत्पन्न मिळविण्याचीही संधी या योजनेत आहे. छतावरील एक किलोवॅटच्या सौर वीज निर्मिती प्रकल्पातून महिना १२०, २ किलोवॅटच्या प्रकल्पातून महिन्याला २४० युनिट तर ३ किलोवॅटच्या प्रकल्पातून सर्वसाधारणपणे ३६० युनिट विजेची निर्मिती होऊ शकते.

ही सौर ऊर्जा योजना अनुदानावर आधारित आहे. एक किलोवॅटपर्यंत ३० हजार, दोन किलोवॅट – ६० हजार तर तीन किलोवॅट व त्यापुढील किलोवॅटसाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदरात कर्ज सुविधाही योजनेसाठी उपलब्ध आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी https://pmsuryaghar.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

# नितीन नरंगले यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–**शहराजवळील वाडीतील यश नगरी युनिट एकमधील रहिवासी तथा भारतीय हवाई दलातील निवृत्त जवान नितीन मनोहरराव नरंगले (वय ४१) यांचे दीर्घ आजाराने गुरुवार, दि. १४ मे रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, ३ मुले, दोन भाऊ व भावजय असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी दुपारी उर्वशीघाट येथील लिंगायत स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सचिन नरंगले यांचे ते लहान बंधू होत.

**पान १ वरून...**

**एलसीबी पथकांकडून तिघांना...**

दुसऱ्या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत मालटेकडी ब्रिजखाली संत बाबा बिरसिंगजी पुजारी चौकात गुप्त माहिती वरून प्रज्वल उत्तम गोवंदे (वय २० राहणार त्रिरत्ननगर सांगवी, नांदेड) याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. विठ्ठल घोगरे यांचे फिर्यादीवरून विमानतळ पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही पथकांचे कौतुक पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी केले आहे.

गुन्हेगारांनी गुन्हा करून फरार होण्याचा प्रयत्न न करता कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावुन पोलीस प्रशासनासमोर सरेंडर व्हावे असे पोलीस प्रशासनाकडुन गुन्हेगारांना आवाहन करण्यात आले आहे.

## पत्रकार गंगाधर गंगासागरे यांना 'महाराष्ट्र भूषण जीवन गौरव पुरस्कार' जाहीर

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –नायगाव तालुका डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष तथा नरसी येथील पत्रकार गंगाधर एम. गंगासागरे यांना महात्मा कबीर समता परिषदच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण जीवन गौरव पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे.



गंगाधर गंगासागरे यांच्या पत्रकारिता, सामाजिक बांधीलकी आणि बहुजन समाजातील प्रबोधनपर कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याने पत्रकारिता क्षेत्रासह सर्व स्तरातून त्यांच्या या यशाबद्दल अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# नांदेड येथे महाराष्ट्र राज्य वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटनेची सभा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. अजय पाटील यांनी नांदेड वनविभागाचा दौरा करून वनमजूर, वनरक्षक, वनपाल, वाहनचालक तसेच कार्यालयीन कर्मचारी यांच्या विविध सेवाविषयक अडीअडचणी समजून घेतल्या. त्यांच्या या दौऱ्यादरम्यान संघटनेच्या वतीने त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी संघटनेचे पदाधिकारी एस. एन. सांगळे, भारत काकडे, मुंजाजी माळगे व विनायक सुरेवाड यांनी पुष्पहार व शाल देऊन केंद्रीय अध्यक्षांचे स्वागत केले. त्यानंतर उपवनसंरक्षक श्रीमती मनीषा पाटील यांचा देखील संघटनेच्या वतीने डॉ. अजय पाटील यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.




यानंतर उपवनसंरक्षक कार्यालय, नांदेड येथे अत्यंत अल्प वेळेत संघटनेची सभा आयोजित करण्यात आली. सदर सभेमध्ये क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांच्या विविध सेवाविषयक अडचणी, प्रलंबित बाबी तसेच विविध मागण्यांची सकारात्मक पद्धतीने मांडणी करण्यात आली. तसेच लवकरच वृत्तस्तरीय नियोजित तक्रार निवारण सभा आयोजित करण्याबाबतही निश्चित करण्यात आले.

सभेमध्ये क्षेत्रीय वन कर्मचाऱ्यांना तत्काळ ओळखपत्र उपलब्ध करून देण्याबाबत सूचना करण्यात आल्या. यावेळी उपवनसंरक्षक श्रीमती मनीषा पाटील यांनी सर्व वन कर्मचारी यांनी नियमितपणे गणवेश परिधान करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. गणवेशा-मुळे कर्मचारी वर्गाबद्दल समाजा-मध्ये आदरयुक्त भावना निर्माण होते. तसेच शासकीय सेवेमध्ये शिस्त व ओळख निर्माण होते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. अजय पाटील यांनी संघटनेचे राज्यस्तरीय महा-अधिवेशन लवकरच नागपूर येथे मुख्यमंत्री महोदय तसेच इतर मान्यवर मंत्रीमहोदय यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच या महाअधिवेशनासाठी नांदेड वनविभागाकडून सकारात्मक सहकार्याची अपेक्षा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सदर सभेमध्ये संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष एस. बी. घोडके यांनी विविध विषयांवर सविस्तर मांडणी केली. तसेच एस. एन. सांगळे, रामेश्वर धोंडगे, मुंजाजी माळगे, पांडुरणे, विजयकुमार दासरवाड, श्रीमती देवकुरे, कळणे, राजू जमदाढे, भारत काकडे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. आयत्यावेळी आयोजित करण्यात आलेली ही सभा यशस्वीरित्या पार पाडली असून, उपस्थित वन कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# गुगल करतंय करामती... तुमच्यावर आहे लक्ष..!

हल्लीच्या आधुनिक युगात मोबाइल, इंटरनेट आणि कम्प्युटरशिवाय माणूस जगूच शकत नाही, अशी परिस्थिती आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत सर्वच जण कमी- अधिक प्रमाणात इंटरनेटचा वापर करतच असतो. हल्ली तर, कुठेही, काहीही हवं असलं की, सहजरित्या 'गुगल कर,' असंही सांगितलं जाते आणि 'गुगल'कडूनही शंकेचे निरसन केले जाते. मात्र, सर्वच बाबतीत 'गुगल'वर अवलंबून राहणे धोक्याचे असून, त्यामुळे माणसाचे खासगी आणि सायबर आयुष्य धोक्यात आले आहे. अनेकांना 'गुगल'चा केवळ 'सर्च इंजिन' एवढाच उपयोग माहीत आहे. मात्र, त्या पलिकडेही 'गुगल'कडून विविध 'करामती' केल्या जातात आणि त्याची आपल्याला अजिबातच माहिती नसते. विशेष म्हणजे ते जाणून घेण्याचीही तसदी आपण घेत नाही. मात्र, आपण सातत्याने इंटरनेटवर जे काही करतो, त्या प्रत्येक गोष्टीचे, कृतीचे रेकॉर्ड ठेवले जाते. त्यामुळे तुम्ही कोणत्याही कारणासाठी इंटरनेटचा वापर करत असाल, ती बाब 'गुगल'च्या नजरेतून सुटू शकत नाही.




## गुगल सर्च

गुगल या लोकप्रिय सर्च इंजिनवर आपण बऱ्याचदा हवी ती कृती करीत असतो. बऱ्याचदा माहिती मिळविण्यासाठीही गुगलचा वापर केला जातो. लक्षात घ्या गुगल स्वतः कोणत्याही माहितीची निर्मिती करीत नाही. तुम्हाला हवी असणारी माहिती केवळ कोठे उपलब्ध होते, याचे दिशादर्शन करण्याचे काम गुगलकडून केले जाते. मात्र, गुगलवर आपण जो सर्च करतो, जे शोधतो... त्यासाठी काही शब्द टाइप करतो... ते शब्द, तारीख, वेळ आणि जागेसह साठवून ठेवली जाते. कोणी, कधी, कुठून आणि कोणत्या उपकरणावरून काय सर्च केले, याची इत्यंभूत माहिती, त्याचा झालेला वापर विविध यंत्रणा आणि अल्गोरिथम तयार करण्यासाठी केला जातो. यामुळे कदाचित नुकसान होणार नसेल तरी फायदा दुसऱ्याच कोणाही तरी होतोय, हे नक्की... अनेक जणांना वाटते, की ई-मेल लॉगिन केलेलं असेल तरच सर्च हिस्ट्री राहते? मात्र, असे काहीही नाही. ई-मेल असेल किंवा नसेल... तरीही सर्च हिस्ट्री राहतेच.

» जी मेल : तुमचे ठिकाण आणि माहिती या सर्व गोष्टींवर पाळत ठेवली जात असेल, तर ई-मेल मागे का राहील? जीमेल वर जे काही ई-मेल येतात किंवा पाठवले जातात, ती सर्व माहिती नोंदवून ठेवली जाते. या माहितीचे काय होते? ती चोरून विकली जाते किंवा या माहितीच्या आधारे कुणाला 'ब्लॅकमेल' केले जाते, असे वाटण्याचीही शक्यता आहे. मात्र, तसे काहीही नसते. मात्र, या सर्व माहितीचा उपयोग करून यूजरबद्दल अधिकाधिक माहिती साठवली जाते. ई-मेलचा आशय, कोणी कोणाला का पाठवला, हे समजून घेतले जाते. बऱ्याचदा जी- मेलवरून तुम्ही एका व्यक्तीला पर्यटनासंदर्भात काही मेल केला असेल किंवा एखाद्या विशिष्ट विषयाची माहिती विचारली असेल, तर तुम्हाला काही जाहिरातींचे मेल आलेले दिसतात. तसेच, एखादा शब्द टाइप करताना त्याच्या जवळपासचे किंवा तत्सम शब्द समोर आल्याचे दिसते. ई-मेल न वाचता किंवा त्यावर कोणतीही प्रक्रिया न करता, हे शक्य होईल का?



» गुगल मॅप : तुम्ही आता कुठे आहात, काल कुठे होता, किती वाजता होता, मागच्या महिन्यात, मागच्या वर्षी अशाप्रकारची संपूर्ण माहिती गुगल मॅपकडून साठवली जाते आणि तीही यूजरच्या नकळत..., गुगल मॅपमधील 'माय लोकेशन्स'वर गेल्यावर प्रत्येकाला आपापला आलेख दिसतो. 'जीपीएस' चालू असेल, तेव्हा तर बिनबोभाटपणे हे रेकॉर्ड केलं जातंच, पण अनेकदा आपल्याच चुकीमुळे 'लोकेशन परमिशन' स्वीकारल्या जातात आणि सर्व माहिती अगदी आरामात दिली जाते.

» गुगल ड्राइव्ह : भरीस भर म्हणून की काय कोट्यवधी लोकांची वेगवेगळी महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर अनेक खासगी फोटो, व्हिडिओ, आणि माहिती गुगल ड्राइव्हवर यूजर साठवून ठेवतो. हल्ली तर प्रत्येत यूजरला १५ जीबीपर्यंत मोफत जागा देण्यात आली आहे. ही सर्व माहिती यूजरने स्वतःहून साठवण्यासाठी दिली आहे. त्यामुळे ती माहिती वाचणे आणि तिच्यावर प्रक्रिया करणे गुगलसाठी डाव्या हाताचा मळ बनले आहे.

» चूक आपलीच... : या संपूर्ण यंत्रणांमुळे आपल्या मूलभूत आणि अत्यंत गरजेच्या असलेल्या खासगी अधिकारांचे उल्लंघन होते आहे. मात्र. यात चूक यूजरचीही आहे. कारण, काहीही न वाचता आपण 'प्रायव्हसी पॉलिसी' आणि नियम स्वीकारून मोकळे होतो. बऱ्याचदा हे नियम १०, २० किंवा काही वेळ १०० पेक्षा जास्त पानांचे असतात. त्यामुळे त्यावरील नियम वाचण्यात आपण निष्क्रियता दाखवतो आणि 'I Accept All Terms and Conditions & Privacy Policy'चा पर्याय निवडून मोकळे होतो. यामुळे आपली सायबर सुरक्षा धोक्यात आली आहे. तज्ज्ञांच्या मदतीने सरकारने यावर लवकरच कठोर पावले उचलायला हवीत आणि युरोपियन देशांप्रमाणे आपल्याकडेही काही कायदे आणायला हवेत.

## यूट्यूब अन् जाहिराती

हल्लीचे यूजर सर्वाधिक वेळ यूट्यूबवर घालवत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे इंटरनेटचा सर्वाधिक वापर यूट्यूब पाहण्यासाठी केला जातो, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यूजर कोणता व्हिडिओ पाहतो, त्याला कोणत्या प्रकारचे व्हिडिओ पाहण्यात रस आहे, हे यूट्यूबद्वारे समजून घेतले जाते आणि त्यानुसार जाहिराती दाखवल्या जातात. तुम्ही कोणत्याही वेबसाइटवर गेलात तरी तुम्हाला त्याच त्याच जाहिराती दिसू लागतात. गुगल आणि जाहिरातींचे हे केवळ व्यापारी नाते नसून, गुगल जाहिरातींच्या माध्यमातून यूजरवर पाळत ठेवते. म्हणूनच यूजर केवळ गुगलवरच असेल, तरच त्याची माहिती साठवून ठेवली जाते असे नसून, आता यूजर कोणकोणत्या वेबसाइटवर जातो, किती वेळ थांबतो हे देखील नोंदवले जाते.

## अँड्रॉइड काय करतं...



सर्वांत शेवटची आणि महत्त्वाची बाब म्हणजे अँड्रॉइड....हे देखील गुगलच्याच मालकीचे आहे, हे वेगळे सांगायला नको. अँड्रॉइडवर केलेली प्रत्येक हालचाल देखील साठवून घेतली जाते. मग ते मेसेज असतील, फोटो, व्हिडिओ, काहीही असेल. प्रत्येक अँडॉईड सिस्टीम असलेल्या फोनवर पाळत ठेवता येते. या सर्व माहितीचे संकलन करण्यासाठी कोणीही माणूस बसलेला नाही. माहिती गोळा करणे, प्रोसेस करणे आणि तिचा अभ्यास करणे हे सर्व वेगवेगळ्या अल्गोरिथम आणि प्रणालींकडून केले जाते आणि या प्रकाराला माहितीची चोरीही असे, म्हणता येत नाही. कारण ही माहिती आपण स्वखुशीने गुगलला बहाल केलेली असते.

## इंटरनेट असिस्टंट

गुगल असिस्टंट किंवा ॲमेझॉन सिरी किंवा अलेक्सा याबद्दल बऱ्याच जणांना अजूनही फारशी माहिती नाही. हे सर्व इंटरनेट असिस्टंट अर्थात आयओटी डिवाइस आहेत. ही उपकरणे सध्या बाजारात अगदी स्वस्त आणि सहज उपलब्ध आहेत. टाइप करून एखादी गोष्ट सर्च करण्यापेक्षा केवळ आवाजाच्या माध्यमातून त्याद्वारे सर्च करता येते..तेही कोणत्याही भाषेत... शिवाय सर्च झाल्यावर ऐकूही येते. हे सर्व जेव्हा नवीन होते, तेव्हा याची सर्वांनाच भुरळ पडली होती. या सर्वांसाठी इंटरनेट अत्यंत आवश्यक आहे. मात्र, यातही मोठे सायबर धोके आहेत. इंटरनेट असिस्टंट अनेकवेळा कायम चालू ठेवलेले असतात किंवा ते इंटरनेटशी कायम जोडलेलेच राहतात. घरात किंवा ऑफिसमध्ये कधीही काहीही अडचण आली तर, विचारायला सोपे जावे हा या मागचा उद्देश असतो. मात्र, इंटरनेट असिस्टंट कडून खूप कामेही करवून घेतली जातात. सर्च इंजिन प्रमाणेच या उपकरणांना दिलेले आदेश साठवून ठेवले जातात. या सर्व गोष्टी चोरून साठवल्या जातात असे नाही. मात्र, सांगून आणि पूर्ण कल्पना देऊन ही माहिती हडपली जाते. त्याकडे आपण लक्ष देत नाही एवढंच. ही उपकरणे वापरणाऱ्या व्यक्तींविषयी जास्तीत जास्त माहिती जमवणे. ती संकलित करून त्याचा अभ्यास केला जातो. आवाज आणि भाषा, त्यातील बदल, लहेजा, बोलण्याची पद्धत याचा अभ्यास करून कृत्रिम आवाज निर्मितीचा प्रयत्न केला जातो. हे उपकरण वापरणाऱ्या व्यक्तींच्या वैयक्तिक आवडीनिवडी जाणून घेणे आणि त्याचा वापर करून इतर मोठ्या कंपन्यांच्या जाहिरातींसाठी उपयोग केला जातो.

## हे सर्व धोकादायक कसे?

या सर्व गोष्टींमध्ये नक्की धोका काय आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु, आजही त्याविषयी अनेकांना माहिती नसल्याचे दिसून येते. तुमच्या काही बाबी जर कोणाला माहिती असतील आणि त्या सार्वजनिक ठिकाणी उघड झाल्या तर तुम्ही अडचणीत येऊ शकता.

- तुमचा जन्म कुठे झाला, जन्म तारीख, मूळ गाव आणि आताचे रहिवासी ठिकाण.
- शाळा, कॉलेज, शिक्षण, नोकरी, मित्र-मैत्रिणींची नावे, त्यांची माहिती, त्यांच्या कॉलेज किंवा नोकरीची ठिकाणे.
- वर्षभरात त्यांना तुम्ही कुठे कधी कसे भेटलात, काय संभाषण झाले, काय ई-मेल किंवा मेसेज किंवा केले गेले, किती वेळ फोन केला?
- इंटरनेटवर कधी आणि काय काय शोधले, काय काय बघितले, मोबाइलमध्ये काय काय आहे, काय काय नष्ट केले आदी.

# अजब-गजब

## वय 17 अन् उंची एक वर्षाच्या बाळाएवढी...

**वॉशिंग्टन :** जगातील सर्वांत छोटा व्यक्ती म्हणून फिलिपीन्सच्या १७ वर्षीय जुनेर बालाविंगचे नाव समोर आले असून, तो अवघा २२ इंच उंच आहे. जूनमध्ये १८ वर्षांचा झाल्यानंतर त्याला अधिकृतरित्या जगातील सर्वांत ठेंगणा व्यक्ती घोषित केले जाईल. सध्या हा रेकॉर्ड नेपाळच्या खगेंद्र थापाच्या नावावर आहे. जुनरे खगेंद्रपेक्षा पाच इंच छोटा आहे. खगेंद्र २७ इंच उंच आहे. जुनेर एक वर्षाचा होता तेव्हापासून त्याची वाढ थांबली होती. त्याचे शरीर इतके कमजोर आहे की तो दीर्घकाळ उभाही राहू शकत नाही. फारसे चालणे- फिरणे त्याला शक्य होत नाही. याउप्परही त्याची मान अभिमानाने ताठ आहे. त्याला आनंद आहे की पुढील अडीच महिन्यांनी त्याचे नाव गिनीज बुकात नोंदले जाईल. जुनरेला तीन भावंडे आहेत. आई- वडिल आणि भावंडांसह तो जांबोआंगा डेल नॉर्टे राज्यात राहतो. त्याचे तिन्ही भावंडे सामान्य आहेत. जुनेरची 35 वर्षीय आई कोंसेप्कियॉन त्याला एकही क्षण एकटे सोडत नाही. सारखी त्याची काळजी घेत असते. गिनीज बुकच्या प्रवक्त्याने पत्रकारांशी बोलताना सांगितले, की जुनेर १८ वर्षांचा पूर्ण झाल्यानंतर त्याची उंची मापण्यात येईल. त्यानंतर त्याचा वर्ल्ड रेकॉर्ड घोषित करण्यात येईल.






## शहर पांघरली निळाई

लंडन : मोरक्को देशातील शैफचाऊएन नावाचे हे शहर पूर्णपणे निळं आहे. शहरातील सर्व घरे निळ्या रंगात आहेत. अगदी शाळा आणि मंदिरंही निळ्या रंगांनी रंगलेली दिसतात. शहराची निळाई मात्र पर्यटकांसाठी नवलाई ठरली आहे. त्यामुळे पर्यटक मोठ्या उत्सुकतेने या शहराला भेट देत आहेत. शैफचाऊएन शहरातील हस्तशिल्प आणि बकरीच्या दुधापासून बनलेले पनीर प्रचंड प्रसिद्ध आहे. १४७१ मध्ये मोराक्कोच्या उत्तरेला हे शहर वसले होते. पोर्तुगाली हल्ल्यांपासून वाचण्यासाठी स्पेनमधून बाहेर पडलेल्या काही नागरिकांनी या ठिकाणी एक किल्ला बनवला होता. यानंतर किल्ल्याभोवती हळूहळू वस्ती बनत गेली आणि आज शहर बनले. मॉरिस्कोस आणि यहुदी शरणाथही या शहराला सुरक्षित समजून राहू लागले आहेत. स्पेनिश भाषेतील चाऊएन या शब्दाचा अर्थ शिंग असा होतो. दोन पहाडांवर वसलेले हे शहर दुरून बघितल्यानंतर दोन शिंगांमध्ये वसलेले वाटते म्हणून शहराला नावही शैफचाऊएन ठेवले आहे. शिंगांमध्ये सुरक्षित असा सरळ अर्थ त्यातून निघतो.



## खांद्यातून शरीरात... शरीरातून पायात अन् पायातून जमिनीत...

## विजेचा शरीरप्रवास, मुलगी बचावली!

लंडन : ब्रिटनमध्ये सर्वांना आश्चर्यचकीत करणारा प्रकार समोर आला असून, या मुलीने मृत्यूला ज्या पद्धतीने चकमा दिला ते पाहून, ऐकून सर्व जण हैराण आहेत. तिच्यावर वीज कोसळली होती. पण



तरीही ती बचावली. वीज तिच्या खांद्यावर पडली. ती शरीरात घुसली. शरीरातून पायांत अन् पायांतून पुन्हा चक्क जमिनीत घुसली... या मुलीचा शरीर प्रवास करत ती भूमातेच्या उदरात गुडूप झाली. विजेने मुलीला कोणतेही नुकसान पोहचवले नाही. ती सहिसलामत राहिली. ज्या वेळी या मुलीवर वीज पडली त्या वेळी ती घरात होती. एरियन मोरान नावाची ही मुलगी दक्षिण वेल्सच्या मेरिथर टेडफिल येथील आपल्या घरातून पाऊस पडताना बघण्याचा आनंद घेत होती. त्याच वेळी आकाशात वीज कडाडली आणि ती खिडकीतून सरळ एरियनच्या अंगावर पडली. त्यानंतर ती एरियनच्या पायातून बाहेरही पडली. त्यामुळे पायाखालील चटई जळली. विज पडण्याचे आणि शरीरातून बाहेर पडण्याचे निशाण एरियनच्या शरीरावर दिसतात. वीज कोसळताच काही क्षण बेशुद्ध पडलेल्या एरियनला तिच्या आई-वडिलांनी तातडीने रूग्णालयात दाखल केले होते, पण त्यानंतर काहीच वेळात ती शुद्धीवर आली. डॉक्टरांनी तिला काहीही झाले नसल्याचे सांगितले. अंगावर वीज पडूनही एरियन वाचली कशी, असा प्रश्न या वेळी डॉक्टरांनाही पडला होता. एरियनच्या शेजाऱ्यांनी सांगितले, की वीज तीन घरांवर कोसळली होती. वीज पडली तेव्हा एखादा बॉम्बस्फोट झाल्यासारखा आवाज झाला. त्यातून एरियन वाचली यावर विश्वासही बसत नाही.

### एरियन भाग्यशाली

आमची मुलगी अत्यंत भाग्यशाली असून, देवाची तिच्यावर कृपादृष्टी आहे, हे आम्हाला या घटनेवरून दिसून आले आहे. एरियनला पहिल्यापासून देवाची भक्त करण्याची सवय आहे. तिची भक्तीच तिच्या कामी आली असे आम्हाला वाटतेय. या घटनेने आम्हाला देवावर श्रद्धा ठेवल्याने संकटसमयी देव धावून येतो, याची जाणीव झाली आहे.

**- मार्क मोरान, एरियनचे वडील.**

## चीनमध्ये जन्मली दोन डोक्यांची मुलगी

**बीजिंग :** आतापर्यंत आपण एखाद्या प्राण्याने दोन डोक्यांचे पिल्लू जन्माला घातल्याचे ऐकले असेल. असे प्रकार वासरू किंवा बोकडाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर घडले आहेत. मानवाच्या बाबतीत मात्र केवळ कहाण्यांतच आपण दोन डोक्यांचे बाळ जन्माला आल्याचे वाचले असेल. पण कहाण्यांतील ही काल्पणिकता वास्तवात उतरल्याचे नुकतेच दिसून आले असून, सर्वांना आश्चर्यचकीत करणारी मुलगी चीनमध्ये जन्माला आली आहे. या मुलीला दोन डोकी आहेत. तिची दोन डोकी एकमेकांना अशी चिटकलेली आहेत, की शस्त्रक्रिया करून वेगळी करायची म्हटली तरी शक्य होणार नाही. तूर्त, या मुलीला स्थानिक लोकांनी देवीचा अवतार समजून पुजायला सुरुवात केली आहे. दक्षिण चीनच्या सिचुआन प्रांतातील स्यूनिंग शहरात या विचित्र मुलीने जन्म घेतला आहे. २५ वर्षांची महिला बाओ क्विओयिंगने स्यूनिंग सेंट्रल हॉस्पिटलमध्ये या मुलीला जन्म दिला. डॉक्टरही या मुलीला पाहून हैराण झाले असून, त्यांनी अशा स्वरूपाची घटना चीनमध्ये पहिल्यांदाच घडल्याचे सांगितले. गर्भवती राहिल्यानंतर बाओने जेव्हा स्कॅन केले होते, तेव्हा मुलीची सामान्यपणे वाढ होत होती. त्यामुळे ती आणि तिचा पती आई- बाप बनण्याच्या ओढीने जाम खुश होते. दुसऱ्या आणि तिसऱ्या चेकअपमध्येही काही वेगळे आढळले नव्हते. पण चौथ्या चेकअपसाठी जेव्हा बाओला तिचा पती घेऊन गेला. तेव्हा डॉक्टरांनी विचित्र मुलीचा जन्म होणार असल्याचे त्यांना सांगितले. गर्भातच या मुलीला दोन डोकी असल्याचे डॉक्टरांना स्कॅनमध्ये दिसले होते. शस्त्रक्रियेद्वारे मुलीचा जन्म झाला. मुलीची तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी तिच्याविषयी अधिक माहिती दिली. तिला दोन डोक्यांबरोबर दीड हृदय आहे. उर्वरित तिचे सर्व अंग सामान्य मुलीसारखेच आहे. डॉक्टरांनी सांगितले, की मुलीच्या डोक्यांची शस्त्रक्रिया अवघड आहे. तिला आयुष्यभर दोन डोक्यांसह जगावे लागेल. तिची शस्त्रक्रिया करण्याचा प्रयत्न केलाच तर तिचा जीवही जाऊ शकतो, असे त्यांनी मुलीच्या पालकांना बजावले आहे. दोन डोक्यांची मुलगी जन्माला आल्याचे वृत्त सगळीकडे पसरताच उत्सुकतेने लोकांनी तिला पाहण्यासाठी गर्दी केली होती. काहींनी हा ईश्वरी अवतार समजून तिला घरी आणल्यावर पुजाही सुरू केली. प्रसारमाध्यमांनी या प्रकाराची भनक लागताच त्यांनीही बाओचे घर गाठले.



### गर्भपाताची वेळ निघून गेली होती...

डॉक्टरांनी जेव्हा मला संभाव्य मुलगी कशी असेल याची कल्पना दिली तेव्हा मी हादरून गेले होते. आम्ही घाबरून दुसऱ्या डॉक्टरांकडे गेलो. तिथेही चेकअप केले. पण त्यांनीही तेच सांगितले. त्यामुळे एकक्षण माझा देवावरचा विश्वास उडाला होता. पण तरीही मी स्वतःला सावरले. माझ्या पतीने आणि मी मिळून गर्भपात करण्याचा निर्णय घेतला. पण तोपर्यंत उशिर झाला होता. गर्भपात होणे शक्य नव्हते. या परिस्थितीत गर्भपात केला तर आईचा जीवही जाऊ शकतो, असे डॉक्टरांनी सांगितले.

**-बाओ क्विओयिंग (मुलीची आई)**

## Change In Name

My old name is **Mohammed Muzaffar Uddin Wahaj** which now I am Changing as new Name. **Mohammed Muzafar Uddin Wahaj.** Hence forth my all correspondence Will be done as pes my new name. Please consider, the same.

Address - H.No. 6-3-143, Dhangar Tekdi, Old Gunj Nanded 431604 (MS.)

जलसंपदा विभाग
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकासमहामंडळ,छ.संभाजीनगर
कार्यकरी अभियंता,विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.02, नांदेड
दुरध्वनी क्रमांक (02462 260960) E-mail : eevpd2.@gmail.com (पिन 431605)

### महाराष्ट्र शासन

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विका महामंडळ.औरंगाबाद (अंगीकृत)
कार्यकारी अभियंता, विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्र. 2.नांदेड.
ई निविदा सुचना क्र. 02 सन 2026-27

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्यावतीने कार्यकारी अभियंता, विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्र.2.नांदेड. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील एक (01) कामाकरीता, ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदांची माहिती कंत्राटदारची वर्गवारी शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्र. 2, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचने मध्ये कांही बदल होत असल्यास https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कामाचे नांव: शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प ता. जि. नांदेड येथील पंपगृह इमारतीचे दुरुस्तीचे काम.
(रु: 212.20 लक्ष वस्तु व सेवा कर वगळुन)
जिल्हा: नांदेड
एका कामाची निविदा किंमत रु: 212.20 लक्ष
ई निविदा उपलब्ध कालावधी दिनांक- 15/05/2026 ते 22/05/2026
ई निविदा उघडण्याचा दिनांक : 25/05/2026
जा.क्र.विप्रविक्र.2/लेखा-4/986/सह दिनांक: 12/05/2026

(चारुदत्त आर.बनसोड)
कार्यकारी अभियंता
विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.2
नांदेड

## जाहीर प्रगटन

सर्व हितसंबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, लाल बहाद्दुर शास्त्रीनगर, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेड चे सभासद शंकरसिंह हिरासिंह माचनूरकर (प्लॉट नं. ३६) हे आमच्या संस्थेचे सभासद असून त्यांचे निधन दि. २२.१०.२०१६ रोजी झाले आहे. संस्थेतील त्यांच्या नावावरील प्लॉट नं. ३६ चे वारसा हक्काने हस्तांतरण त्यांचा मुलगा श्री बलरामसिंह शंकरसिंह ठाकूर यांच्या नावाने हस्तांतरण करावे म्हणून संस्थेकडे लेखी अर्ज दिला आहे. शंकरसिंह हिरासिंह माचनूरकर यांच्या सर्व वारसांनी प्लॉट नं. ३६ चे हस्तांतरण श्री बलरामसिंह शंकरसिंह ठाकूर यांच्या नावाने करण्यास संमती लेखी स्वरूपात दिली आहे. त्यास त्यांच्या हितसंबंधितांचा काही आक्षेप असेल तर हे जाहीर प्रगटन प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी आक्षेप दाखल करावा. ७ दिवसांच्या आत कोणाचा आक्षेप न आल्यास संस्था प्लॉट नं. ३६ चे हस्तांतरण श्री बलरामसिंह शंकरसिंह ठाकूर यांच्या नावाने करणार आहेत. याची नोंद घ्यावी.

**जाहीर प्रगटन देणार**
**सचिव**
**लाल बहाद्दुर शास्त्री नगर,**
**सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेड**

## Change In Name

My old name is **Sagita Prakash Johre** which now I am Changing as new Name. **Sangeeta Prakashrao Johare.** Hence forth my all correspondence Will be done as pes my new name. Please consider, the same.

Address - 2-11-285, Mathura Niwas, Vazirabad, Nanded 431601

## जाहीर प्रगटन

मौजे वाडी (बु.) ता.जि. नांदेड हद्दीतील गट नं. ४०/बी/ १ प्लॉट नं. जुना ३० व नवीन ०३ ज्याची साईज लांबी - दक्षिण-उत्तर ४० फुट व रूंदी पूर्व-पश्चिम- २५ फुट म्हणजे एकूण क्षेत्रफळ १००० चौ.फुटाचा प्लॉट सौ. रमाबाई नामदेव इंगोले रा. आयोध्यानगर, तरोडा (बु.) नांदेड यांचेकडून निकिती भगवान गोवंदे रा. चंद्रलोक हॉटेल समोर, गोविंद नगर, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. ०४, पश्चिमेस - प्लॉट नं. ०२, दक्षिणेस - संभाजीराव मारोतराव पावडे यांचे शेत व उत्तरेस - २० फुट रूंद रोड.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत सुरेखा सुनिल कदम यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

| मार्फत | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. सावित्री जोशी | निकीता भगवान गोवंदे |
| गोकुळ निवास, सोमेश कॉलनी, | रा. चंद्रलोक हॉटेल समोर, गोविंद |
| कलामंदिर नांदेड | नगर नांदेड |
| मो.नं. ९४२१७६१८९८, ९४२००९०१९८ | मो.नं. ९५२९६४९४९० |

## जाहीर प्रगटन

ज्या अर्थी माझे पक्षकार नामे जयवंत पि. मारोती इबितवार रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन खालील प्रमाणे जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येते की, माझे पक्षकार जयवंत पि. मारोती इबितवार हे सगरोळी येथील शेत गट क्रं.८०६ एकुण क्षे.४ हे.४९ आर. पैकी १ हे.१३ आर. स्थित मौ. सगरोळी ता. बिलोली शेतजमीनीचे मालक व कब्जेदार असुन सदर शेतजमीन त्यांनी खरेदीखत क्रं. १७०८ दि.१७/०५/२००५ अन्वये मलगोंडा पि.हणमंत घुरके रा. सगरोळी यांचेकडून किमंत रक्कम रुपये १,५५,०००/- हजार रुपयात खरेदी केले असुन सदरील जमीन त्यांची स्वकष्टार्जीत व स्वतंत्र मालकीची जमीन आहे. सदर गट क्रं. ८०६ क्षे. १ हे.१३ आर. पैकी ०० हे.५० आर शेतजमीन हे त्यांचा भाऊ माधव पि. मारोती इबितवार यांचे नावे नामधारी नावपरिवर्तन केले आहे. तरी माधव पि. मारोती इबितवार यांनी त्यांचे नावे नामधारी असलेली शेतजमीन शेत गट क्रं. ८०६ क्षे. ०० हे. ५० आर हे कुठलीही कौटुंबिक अडचण नसतेवेळेस व बेकायदेशिर फेरफार आधारे स्वतःचे नावे झाल्याचा गैरफायदा घेऊन सदर जमीन विक्री करण्याचे अधिकार नसतेवेळेस जमीन विक्री करण्याचे प्रयत्नात आहे. त्यामुळे माधव पि.मारोती इबितवार यांचे नावे असलेल्या शेत गट क्रं.८०६ क्षे.०० हे. ५० आर. शेतजमीनीशी माधव पि. मारोती इबितवार यांचा मालकी हक्काचा व ताब्बेचा अर्थाअर्थी संबंध नाही. माधव मारोती इबितवार हा सदर जमिनीचा कायदेशिर मालक व कब्जेदार नाही. त्यामुळे माधव पि.मारोती इबितवार यांचे नावे असलेले शेत गट क्रं.८०६ क्षे. ०० हे. ५० आर. स्थित मौ. सगरोळी ता. बिलोली शेत जमीनीशी कोणीही खरेदी विक्री किंवा ईतर कोणत्याही प्रकारे हस्तातंरणाचा व्यवहार व करार करु नये. केल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी तुमचेवर राहिल.

करीता हे जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येते.

| मार्फत | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. शि. ना. पाटील | जयवंत पि. मारोती इबितवार |
| कोर्ट बिलोली | रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड |

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७७ मधील क्षेत्र १.८१ हे. आर. आकार रु. २.४८ पैसे असलेली सौ. कांताबाई विठ्ठल शिंदे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. बी. डी. कुलकर्णी | AEW Smart Service |
| मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर, | Private Limited |
| जि.नांदेड-४३१८०१ | प्रो. प्रा. आशीष सिंगल, |
| मो.नं. ८८५६८०१२२९. | रा. दिल्ली. |

## जाहीर प्रगटन

